केंद्र पुरस्कृत कृषि उन्नती योजना, राष्ट्रीय अन्न सुरक्षा अभियान- अन्नधान्य पिके या योजनेंतर्गत अन्नधान्य पिकांकरिता सन २०१७-१८ या आर्थिक वर्षाकरिता केंद्र शासनाकडून प्राप्त हप्ता **(लेखाशिर्ष २४०१ A५५७)** तसेच समरुप राज्य हिस्सा **(लेखाशिर्ष २४०१ A५६६) निधी** वितरीत करणेबाबत.

**महाराष्ट्र शासन**

**आदिवासी विकास विभाग**

**शासन निर्णय क्रमांकः बीयुडी-२०१७ / प्र.क्र.११ / कार्यासन.६**

मंत्रालय विस्तार, मुंबई-४०० ०३२

तारीख: - २० जानेवारी, २०१८.

<u>वाचा -</u>

१) वि, शासन परिपत्रक क्र.अर्थसं-२०१७ /प्र.क्र.६८ / अर्थ-३, दि. ०१.०४.२०१७.

२) वि. वि, शासन परिपत्रक क्र. अर्थसं-२०१७ /प्र.क्र.७५ / अर्थ-३, दि. १८.०४.२०१७.

३) वि. वि, शासन परिपत्रक क्र. अर्थसं-२०१७ /प्र.क्र.९४ / अर्थ-३, दि. ३०.०६.२०१७

४) केंद्र शासन, कृषि आणि शेतकरी कल्याण मंत्रालयाचे पत्र क्रमांक F.No.२०-२७/2017-NFSM(CA-V), दि.०१ डिसेंबर, २०१७.

५) कृषि व पदुम विभाग, नस्ती क्र. असुअ -१०१७ / प्र. क्र. ३३/४-अे.

६) आदिवासी विकास विभाग, शासन निर्णय समक्रमांक दि.१८-८-२०१७ व दि.२१-१२-२०१७.

**शासन निर्णय-**

केंद्र पुरस्कृत कृषि उन्नती योजना, राष्ट्रीय अन्न सुरक्षा अभियान( NFSM) अन्नधान्य पिकांकरिता अनुसूचित जमाती प्रवर्गासाठी मागणी क्र. टी-५, २४०१ पीक संवर्धन, ७९६-जनजाती क्षेत्र उपयोजना, (०१) जनजाती क्षेत्र उपयोजनांतर्गत योजना राज्य योजनांतर्गत योजना, (०१) (२१) कृषि उन्नती योजना - राष्ट्रीय अन्न सुरक्षा अभियान-अन्न धान्य पिके (केंद्र पुरस्कृत योजना ) लेखाशिर्ष २४०१ A५५७, ३३- अर्थसहाय्य याखाली रु.१९२१.७४ लाख इतका निधी तर (०१) (२२) कृषि उन्नती योजना -राष्ट्रीय अन्न सुरक्षा अभियान-अन्न धान्य पिके (कें.पु.यो.राज्य हिस्सा) लेखाशिर्ष २४०१ A५६६, ३३-अर्थसहाय्य याखाली रु.१२८१.१७ लाख इतका निधी अर्थसंकल्पीत करण्यात आला आहे.

केंद्र शासनाने सन २०१७-१८ या आर्थिक वर्षात कृषि उन्नती योजना -राष्ट्रीय अन्न सुरक्षा अभियान-अन्न धान्य पिके या योजनेंतर्गत दुस-या हप्त्याकरिता रु.५९३.८७ लाख इतका निधी वितरीत केला आहे. त्यानुषंगाने कृषि व पदुम विभागाच्या संदर्भाधीन क्र. ५ येथील प्रस्तावास अनुसरुन २४०१, पीक संवर्धन, ७९६-जनजाती क्षेत्र उपयोजना, (०१) जनजाती क्षेत्र उपयोजनांतर्गत योजना राज्य योजनांतर्गत योजना, (०१) (२१) कृषि उन्नती योजना- राष्ट्रीय अन्न सुरक्षा अभियान-अन्न धान्य पिके (केंद्र पुरस्कृत योजना ) लेखाशिर्ष २४०१ A५५७, ३३-अर्थसहाय्य याखाली रु.५९३.८७ लाख ( अक्षरी रुपये पाच कोटी त्र्याण्णव लाख सत्त्याऐंशी हजार फक्त ) इतका निधी तर त्यास समरुप राज्य हिस्सा (०१) (२२) कृषि उन्नती योजना-राष्ट्रीय अन्न सुरक्षा अभियान-अन्न धान्य पिके (कें.पु.यो.राज्य हिस्सा) लेखाशिर्ष २४०१ A५६६, ३३-अर्थसहाय्य याखाली रु. ३९५.९१ लाख ( अक्षरी रुपये तीन कोटी पंच्याण्णव लाख एक्याण्णव हजार फक्त ) इतका निधी प्रशासकीय विभाग / नियंत्रक अधिकारी म्हणून

प्रधान सचिव, कृषि, पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय विकास विभाग, मंत्रालय, मुंबई यांना अर्थसंकल्पीय वितरण प्रणालीवर (BEAMS) वितरीत करण्यास मंजूरी प्रदान करण्यात येत आहे.

२. सदर निधी अर्थसंकल्पीय वितरण प्रणालीवर वितरीत करण्यात आला आहे. नियंत्रण अधिकारी / विभागप्रमुख यांनी खर्चासंबंधीच्या सध्याच्या शासकीय धोरणास अनुसरुन मंजूर आराखडयानुसार याच वर्षात सदर निधी खर्च होईल याची दक्षता घ्यावी. तसेच उपलब्ध करुन दिलेल्या तरतूदीतून झालेल्या खर्चाचा अहवाल, लेखाशिर्षनिहाय / उपलेखाशिर्षनिहाय तसेच साध्य झालेले भौतिक उद्दिष्टनिहाय माहिती, निधी उपयोगिता प्रमाणपत्र, संबंधित क्षेत्रिय अधिकारी यांनी आयुक्त, आदिवासी विकास, नाशिक; संबंधित अपर आयुक्त, आदिवासी विकास; आदिवासी विकास विभाग व कृषि व पदुम विभाग यांना प्रत्येक महिन्याच्या १० तारखेपर्यंत पाठवणेबाबत सूचना देण्यात यावी.

३. नियंत्रण अधिकारी व विभाग प्रमुख यांनी आदिवासी उपयोजना क्षेत्रात अतिरिक्त आदिवासी उपयोजना क्षेत्रात तसेच आदिवासी उपयोजने क्षेत्राबाहेरील योजनांवर केलेला खर्च स्वतंत्रपणे नोंदविला जाईल याची दक्षता घ्यावी. जेणेकरुन शासनाला आदिवासी क्षेत्रातील व उपयोजने क्षेत्राबाहेरील योजनांवर होणा-या खर्चावर लक्ष ठेवता येईल.

४. सदर शासन निर्णय वित्त विभागाने **वाचा** येथील क्रमांक १ व क्रमांक २ अन्वये विभागास प्रदान केलेल्या अधिकारान्वये तसेच अनौपचारिक संदर्भ क्र. ४९८/अर्थोपाय, दि.०७-१२-२०१७ अन्वये दिलेल्या सहमतीस अनुसरुन निर्गमित करण्यात येत आहे.

५. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१८०१२०१५२५४५५६२४ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

Ravindra Digambarrao Aute

Digitally signed by Ravindra Digambarrao Aute
DN: cn=Ravindra Digambarrao Aute, o=Tribal Development Department, ou=Government of Maharashtra, email=rajendra.aute@nic.in, c=IN
Date: 2018.01.20 16:02:26 +05'30'

(रविंद्र दि. औटे)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन.

**प्रत,**

१. प्रधान सचिव (कृषि) कृषि व पदुम विभाग, मंत्रालय, मुंबई.
२. आयुक्त, कृषि, महाराष्ट्र राज्य.

३. आयुक्त, आदिवासी विकास, महाराष्ट्र राज्य, नाशिक.

४. अपर आयुक्त, आदिवासी विकास, नाशिक / नागपूर / ठाणे / अमरावती.

५. वित्त विभाग ( अर्थसंकल्प- १९ ), मंत्रालय, मुंबई.

६. कृषि व पदुम विभाग मंत्रालय, मुंबई.

७. ग्रंथपाल, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, ५ वा मजला, विधानभवन, मुंबई.

८. महालेखापाल (लेखापरिक्षा)/(लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र १/२, मुंबई/नागपूर.

९. कार्यासन क्र. २ व ९, आदिवासी विकास विभाग, मंत्रालय, मुंबई- ४०० ०३२.

१०. निवड नस्ती (का.६), आदिवासी विकास विभाग